# मिरा भाईंदर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग
## प्रेस नोट

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागाचे सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या मालमत्ता कराच्या एकुण मागणीपैकी आता पर्यंत रु. २०८.४२ कोटी रक्कम वसूल केलेली असून मालमत्ता कराची जास्तीत जास्त वसूली करणेकरीता मालमत्ता कराच्या वसूलीकरीता थकबाकीदार मालमत्ता धारक यांचेकडुन मालमत्ता कराची वसूली करणेकरीता मोहिम हाती घेतली आहे. वसूली मोहिमकरीता इतर विभागातील अधिकारी / कर्मचारी यांना प्रभाग निहाय नियंत्रण अधिकारी व सहा. नियंत्रण अधिकारी म्हणून नियुक्त केलेले असून थकबाकीदार मालमत्ता धारक यांना प्रत्यक्ष भेटुन मालमत्ता कराची वसूली करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

थकबाकीदार मालमत्ता धारक यांना नोटीस, अंतिम नोटीस बजाऊन मालमत्ता जप्तीची कार्यवाही प्राधान्याने सुरु केली आहे. मिरा भाईंदर मनपा क्षेत्रात एकूण ८४ मालमत्ता जप्त केल्या असून त्यांची थकीत रक्कम ९२,१२,७२७/- एवढी आहे.

तसेच नागरीकांना सुट्टीच्या दिवशी मालमत्ता कराचा भरणा करणे सोईचे व्हावे याकरीता मार्च अखेर पर्यंत सर्व शनिवार व इतर सुट्टीच्या दिवशी मालमत्ता कर भरणा केंद्र सुरु ठेवण्याचे निर्देश दिले असून त्यानुसार मार्च अखेरपर्यंत कार्यालयीन सुट्टीच्या दिवशी मालमत्ता कराचा भरणा स्विकारण्यांत येणार असून नागरीकांनी जप्तीची कार्यवाही टाळायची असल्यास मालमत्ता कराचा भरणा करुन महानगरपालिकेस सहाकार्य करावे असे आवाहन मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी नागरीकांना केले आहे.